**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र: व.वि.श.म./ / /२५-२६**
**दिनांक : 19/08/2025**

# वसई विरार शहर महानगरपालिका

महानगरपालिकेने केलेल्या विविध उपाययोजना व दिलेल्या सुविधांमुळे अतिवृष्टीमध्ये नागरिकांना मिळाला दिलासा.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात आज मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने शहरातील काही ठिकाणी सखल भागांमध्ये व रस्त्यांवर पाणी साचले होते, तसेच काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरले होते. महानगरपालिकेमार्फत साचलेले पाणी काढण्यासाठी ५४ संक्शन पंपांची व्यवस्था करण्यात आली असून संक्शन पंप लावून विविध ठिकाणी साचलेले पाणी काढण्यात आले आहे, तसेच काही ठिकाणी जेसीबी द्वारे पाणी जाण्यास मार्ग करण्यात आले असून काही ठिकाणी पाणी काढण्याचे काम सुरू आहे.

पावसाचे पाणी साचल्यामुळे जेथे नागरिक अडकले होते, त्या ठिकाणी महापालिकेच्या रेसक्यू टीम मार्फत ट्रॅक्टर- ट्रॉली, अग्निशमन वाहने तसेच लाईफ बोटीद्वारे नागरिकांची सुटका करण्यात आली व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहचविण्यात आले. महानगरपालिका क्षेत्रातील दरड प्रवण क्षेत्र, भूस्खलन क्षेत्रांना मनपा अधिकाऱ्यांनी भेट देवून तेथील नागरिकांचे स्थलांतर मनपाच्या तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये केले आहे. महानगरपालिकेच्या प्रभाग समिती निहाय एकूण ३४ तात्पुरती निवारा केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. पावसाचे पाणी साचल्यामुळे अडकलेल्या ५०४ नागरिकांची सुखरूप सुटका करून त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले असून काहींना मनपाच्या तात्पुरत्या निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आले आहे. त्यांच्या जेवणाची सोय जीवदानी देवी मंदिर ट्रस्ट वतीने करण्यात आली आहे.महानगरपालिकेने श्री जीवदानी देवी मंदिर ट्रस्टला विनंती केल्यानंतर त्या विनंतीला मान देवून त्यांनी २३००० फूड पॅकेटचा मोफत पुरवठा केला आहे. त्यामुळे आज शहरात पावसामुळे विस्थापित झालेल्या लोकांची अत्यंत व्यवस्थित सोय झाली आहे.

शहरात आज ठिकाणी १० झाडे पडल्याच्या घटना घडल्या असून अग्निशमन विभागामार्फत ट्री कटर च्या साहाय्याने पडलेली झाडे हटविण्यात आली आहेत. काही ठिकाणी कचरा अडकून बंद झालेली गटारे, चेंबर, रस्त्यावरील मॅनहोल कर्मचाऱ्यां मार्फत साफ करून पाण्याचा निचरा सुरळीत करण्यात येत आहे.

माननीय आयुक्त श्री मनोजकुमार सूर्यवंशी यांनी आज दिवसभरात शहरातील बहुतांशी पाणी तुंबलेल्या ठिकाणी स्वतः तसेच त्यांचे सहकारी अतिरिक्त आयुक्त श्री संजय हेरवाडे व शहर अभियंता श्री प्रदीप पाचंगे यांच्यासोबत प्रत्यक्ष पाण्यात उतरून पाहणी करून नागरिकांच्या यासंदर्भातील समस्या सोडवण्यासाठी प्रशासनास जागेवरच सूचना देत होते.अशा पद्धतीने पाहणी करणारे पहिलेच आयुक्त असल्याने शहरात हा चर्चेचा विषय झाला आहे.

मा.आयुक्त महोदयांनी आचोळे येथील मुख्य अग्निशमन कार्यालयाला भेट देवून शहरातील सर्व परिस्थितीची माहिती घेतली व संबंधित अधिकाऱ्यांना आपत्ती निवारणाच्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना दिल्यात. तसेच माननीय आयुक्त महोदयांनी माननीय आमदार श्रीमती स्नेहा दुबे - पंडित यांच्यासोबत त्यांच्या अधिनस्त परिसराची पाहणी केली.

हवामान विभागाने पुढील २ दिवसात जिल्ह्यात अतिवृष्टीची शक्यता वर्तवली असल्यामुळे नागरिकांनी अतिमहत्त्वाचे काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये असे आवाहन मा.आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.

या आपत्ती काळात नागरिकांच्या सेवेसाठी महानगरपालिकेमार्फत विविध उपाययोजना केल्या जात असून काहीही अडचण आल्यास नागरिकांनी महानगरपालिकेने आपत्ती व्यवस्थापन केंद्रांशी संपर्क करावा. महानगरपालिका या आपत्ती काळात नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असून नागरिकांनीही महनगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त महोदयांनी केले आहे.